महात्मा फुले महाविद्यालय किनगांव ता. अहमदपूर, जि. लातूर

Extersion Outreach Programme.

Report:- 2012-13 TO 2017-18

''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर''

मौजे. हंगेवाडी ता. अहमदपूर जि. लातूर.

04 जानेवारी ते 10 जानेवारी 2013

05.01.2013 रोजी सायंकाळी 07:00 वाजता ''स्त्री–पुरुष समानता काळाची गरज'' या विषयावर प्राध्यापिका श्रीमती कानवटे डि.एस. उपस्थितांना मार्गदशन करताना म्हणाल्या की, स्त्री आणि पुरुष एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रीयांनी आपले आस्तित्व सिध्द करुन दाखविले आहे. ''चुल आणि मुल'' या चाकोरीच्या बाहेर येवून स्त्रीयांनी विविध आव्हानांचा सामना करुन पुरुषांच्या बरोबरीने कार्य करावे व उदयाच्या समृध्दशाली भारतासाठी ''स्त्री–पुरुष समानता कशी आवश्यक आहे ते सांगितले.

या कार्यक्मासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

08.01.2013 रोजी सायंकाळी 07:00 वाजता ''व्यसनमुक्ती काळाची गरज'' या विषयावर डॉ. नारागुडे एन.के. उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, आजच्या विज्ञान युगातला युवक हा अनेक विविध प्रकारच्या व्यसनाच्या आहारी जात आहे, त्यामुळे आरोग्याची हानी होत आहे. व विवधि प्रकारच्या रोगाचा बळी पडत आहे, म्हणून या वाढत चाललेल्या व्यसनापासून आजच्या युवकांनी मुक्ती घ्यावी असा संदेश दिला.

या कार्यक्मासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय
किनगांव, ता.अहमदपूर जि.लातूर

Scanned by CamScanner

09.01.2013 रोजी सायंकाळी ठिक 07:00 वाजता ''महिला बचत गट स्त्री सक्षमीकरणाचा मुलमंत्र'' या विषयावर डॉ एस. जी. भांगे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिला कशाप्रकारे सक्षम होतात, हे विविध मुदयांना स्पर्श करुन गावकऱ्यांना बचत गट चालवण्याचा संदेश दिला.

या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

सन. 2013–14

''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर''

मौजे. मोहगांव ता. अहमदपूर जि. लातूर.

21 जानेवारी ते 27 जानेवारी 2014

दि. 23 जानेवारी 2017 रोजी बौध्दिक सत्रात सायं. ठिक 07:00 वाजता ''स्त्री भ्रुण हत्या एक सामाजिक समस्या'' या विषयावर प्र. प्राचार्या श्रीमती कानवटे डि. एस. उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की स्त्री भ्रुण हत्या ही एक गंभीर समस्या आहे त्यासाठी आज शासन स्तरावर ''बेटी बचाओ अभियान'' राबविले जात आहे आज प्रत्येकाने मुलापेक्षा मुलगी बरी, प्रकाश देते दोन्ही घरी या उक्ती प्रमाणे समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून मुली विषयी पहाण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे असे त्या म्हणाल्या.

या कार्यकमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

26.01.2014 रोजी सायं. ठिक 07:00 वाजता ''युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद'' या विषयावर प्रा. जगताप एस. ए. मार्गदर्शन करताना म्हणाले की, तरुणाचे तेज हे त्याच्या ज्ञानातुन दिसून येते. आत्मसाक्षात्कार म्हणजे खरे शिक्षण होय, राष्ट्रनिष्ठा, देशभक्ती, राष्ट्रिय ऐक्य, सर्वधर्म समभाव या शिकवणीबरोबरच विश्वची माझे घर मांडण्यामध्येच मानवी जीवनाची सार्थकता असते असे प्रतिपादन केले.

या कार्यकमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय

Scanned by CamScanner

सन 2014–15

''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर''

मौजे. दगडवाडी ता. अहमदपूर, जि. लातूर

17 जानेवारी ते 23 जानेवारी 2015

18.01.2015 रोजी ठिक 07:00 वाजता प्रा. खलंग्रे आर. डी. यांनी ''संत गाडगेबाबांच्या स्वच्छता विषयक विषयाची प्रासंगिकता'' या विषयावर बोलताना म्हणाले की, आजचा युवक व्यसनाधीन बनत चाललेला आहे त्यामुळे स्वच्छतेकडे दुर्लक्ष करत आहे, म्हणून आजाराचे प्रमाण वाढत आहे. ते थांबवण्यासाठी स्वच्छ गावाची निर्मिती करणे गरजेचे आहे. असे ते म्हणाले.

या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

सन. 2015–16

''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर''

मोजे. सोनवणेवाडी ता. अहमदपूर, जि. लातूर.

20 फेब्रुवारी ते 26 फेब्रुवारी 2016

22.02.2016 रोजी सायं. ठिक 07:00 वाजता बौध्दिक सत्रात प्रा. क्षिरसागर एल. डी. ''आजचा युवक आणि व्यसनाधिनता'' या विषयावर बोलताना म्हणाले की आजचा युवक मिडीया, इंटरनेट यांच्या माध्यमातून मोठयाप्रमाणात व्यसनाच्या आहारी जात आहे व आपले आयुष्य बर्बाद करत आहे. संन्मार्गावर येण्यासाठी साधूसंताचे विचार आत्मसात करणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बी.आर. बोडके रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय
किनगांव, ता.अहमदपूर जि.लातूर

Scanned by CamScanner

सन. 2016–17

दि. 23.02.2016 रोजी सकाळी 10 ते 01 दरम्यान ''मोफत सर्व रोग निदान शिबीर'' हिमोग्लोबीनची, रक्तगट तपासणी, एच. आय. व्ही. समुपदेशन व टि.बी तपासणी करण्यात आली.

गावातील 100 पुरुष बांधवांनी, 90 महिला भगिनींनी तसेच 50 शाळेतील मुलांनी रक्त गट तपासणी, हिमाग्लोबीन तपासणी, एच. आय. व्ही. समुपदेषण इ. तपासण्या करुन घेण्यात आल्या.

या शिबीराच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. आर. बोडके, प्राचार्य डि. एस. वाडकर, डॉ. बस्तापूरे एस. पी. डॉ सतिश उगले, डॉ. राजेश्वरी सोळंके, डॉ. बाबासाहेब मुंढे, डॉ आशा पवार, गणेश सुर्यवंशी इ. परिश्रम घेतले.

सन. 2016–17

27 जानेवारी 2017 रोजी महाविद्यालयाच्या शैक्षणिक संकुलामध्ये ''कॅशलेस अर्थव्यवस्था व भारत'' या विषयावर कार्ययााळा संपन्न झाली.

अध्यक्षः– प्रा. डी. एस. वाडकर.

पमुख. पाहुणे :– प्रा. सोट एस. आर.

प्रा. वाघमारे एस. के.

प्रा. चोपणे.

देशाच्या चलन व्यवस्थेतील काही नोटा रद्द करण्याचा निर्णय सत्तारुढ सरकारने घेतला देशाच्या अर्थव्यवस्थेवर (दुरगामी परिणाम करणारा हा निर्णय अतिशय धाडसी होता. सर्वसामान्यांचे जिवनमान यामुळे प्रभावित झाले. बॅकिंग व्यवहारावर याचा जो परिणाम झाला तो म्हणजे 'रोकड रहीत' अर्थव्यवस्था हा व्यवहार कसा करायचा या बद्दल कार्याशाळेत विचार मंथन झाले.

या कार्यशाळेला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांची उपस्थिती लक्षवेधी होती.

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय
किनगांव, ता. अहमदपूर जि.लातूर

Scanned by CamScanner

''पर्यावरण व नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनासाठी युवक शिबीर''

मौजे. लेंडेगांव ता. अहमदपूर, जि. लातूर

दिनांक 31.01.2017 रोजी. रा. से. योजना शिबीर मौजे. लेंडेगांव ता. अहमदपूर येथे प्रा. माधव बावगे यांनी 'अंधश्रध्दा निर्मुलण' या विषयावर प्रात्यक्षिकासह प्रबोधन केले, जादूटोणा, भाणामती, भूताटकी या विषयावर ग्रामस्थांना समजेल अशा भाषेतून प्रबोधन केले, राशी भविष्य, पंचांग अशा खोटया समजूतीवरही प्रहार ओढले, ग्रामस्थासह शिबीरार्थी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपसिथित होत्या.

या कार्यकमासाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय जगताप, रा.से.यो. चे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावातील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

दिनांक 03.02.2017 रा. से. यो. व ग्रामीण रुग्णालय अहमदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'सर्व रोगनिदान शिबीर' मौजे. लेंडेगांव येथे संपन्न झाले. या शिबीराच्या यशस्वितेसाठी कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय जगताप प्राचार्य डि. एस. वाडकर, डॉ. पस्तापूरे, डॉ सतिश ओगले डॉ. गणेशजी सुर्यवंशी इ. परिश्रम घेतले जवळपास 100 पेक्षा जास्त ग्रामस्थांनी याचा लाभ घेतला.

DWad

प्राचार्य
महात्मा फुले महाविद्यालय
किनगांव, ता.अहमदपूर जि.लातूर

Scanned by CamScanner